| MHNG110000492023 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २७.०१.२०२३ |
| | नोंदणी तारीख | : | २७.०१.२०२३ |
| | निकाल तारीख | : | १२.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ०३ ०१ १६ |
| | **निशाणी क्र.** | | **४४** |

## दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कुही, जि. नागपूर यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : पी. के. मुटकुळे)

**नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२३**

१. सौ. रंजना ताराचंद पाटील, **...वादी**
वय–३८ वर्ष, धंदा– घरकाम,
रा. डिगडोह (पांडे), ता. हिंगणा, जि. नागपूर.

०२. सौ. सुषमा प्रभाकर मेश्राम,
वय–३५ वर्ष, धंदा– घरकाम,
रा. माया नगर, कलाभवन केंद्र जवळ, इंदोरा, नागपूर, ता. व जि. नागपूर.

०३. सौ. छाया उर्फ बाली वाटकर गेडाम,
वय–४१ वर्ष, धंदा– घरकाम,
रा. धुलाला, ता. व जि. वर्धा.

०४. सौ. माया पुरुषोत्तम मेश्राम,
वय–४८ वर्ष, धंदा– घरकाम,
रा. आजनी, ता. कुही, जि. नागपूर.

## विरुध्द

०१. श्रीमती प्रीती चंद्रभान सहारे, ...**प्रतिवादी**
वय–३५ वर्ष, धंदा– शेती,
रा. आजनी, तह. कुही, जि. नागपूर.

०२. मास्टर रोहीत चंद्रभान सहारे,
वय–१४ वर्ष, धंदा– शिक्षण,

०३. कु. सरवरी चंद्रभान सहारे,
वय–१२ वर्ष, धंदा– शिक्षण,

०४. मास्टर रक्षीत चंद्रभान सहारे,
वय–०८ वर्ष, धंदा– शिक्षण,
तर्फे प्रीती चंद्रभान सहारे
रा. आजनी, तह. कुही, जि. नागपूर.

०५. श्रीमती लिलाबाई रामचंद्र सहारे,
वय–६८ वर्ष, धंदा–घरकाम,
रा. आजनी, ता. कुही, जि. नागपूर.

०६. इन्फ्राटेक रिअल इस्टेट प्रा.लिमिटेड,
६३, नरेंद्रनगर, शिल्पा को.ऑप.
हाऊसिंग सोसायटी, नागपूर.

०७ श्री. विनोद भगवानदास बत्रा,
वय–वयस्क, वर्ष, धंदा–व्यापार,
रा. पंजवानी मार्केट, इतवारी, नागपूर, ता. व
जि. नागपूर.

०८. विजय आनंदराव शेळके,
वय–वयस्क, धंदा– व्यापार

६३, नरेंद्रनगर, शिल्पा को.ऑप.
हाऊसिंग सोसायटी, नागपूर.

०९. महेंद्र तुळशीराम गवई,
वय–वयस्क, धंदा– व्यापार
६३, नरेंद्रनगर, शिल्पा को. ऑप.
हाऊसिंग सोसायटी, नागपूर.

**दावा –** घोषणा, वाटणी होऊन स्वतंत्र कब्जा व मनाई हुकुम मिळणेबाबत.

---

वादींतर्फे विधीज्ञ : श्री. पी. के. थोटे.
प्रतिवादी क्र.०५ तर्फे विधीज्ञ : श्री. डी. एस. वंजारी.
प्रतिवादी क्र.०१ ते ०४ व ०६ ते ०९ : एकतर्फा.

---

# न्यायनिर्णय

(दिनांक १२.०३.२०२६ रोजी घोषीत)

## वाद मिळकत

| अ.क्र. | सर्वे क्र. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ०१. | १५१/१ | १.४२ आर |
| ०२. | १५१/२ | २.८१ आर |
| ०३. | १५१/३ | १.२१ आर |
| एकुण क्षेत्रफळ ५.४४ आर मौजे खलासना, ता. कुही, जि. नागपूर. (यापुढे वाद मिळकत संबोधण्यात येते.) | | |

## वादीचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे

०१. वादी ह्या मयत रामचंद्र जयराम सहारे यांच्या मुली असुन प्रतिवादी क्र.०१ चे पती व प्रतिवादी क्र.०२ ते ०४ यांचे वडील मयत चंद्रभान सहारे यांच्या बहिणी आहेत. प्रतिवादी क्र.०५ ही वादी व मयत चंद्रभान सहारे यांची आई आहे. जयराम सहारे यांच्या मालकीची मौजे खलासना येथे वडीलोपार्जीत मिळकत सर्वे क्र.१५१ (जुना २५) क्षेत्रफळ ५.४४ आर होती. त्यांच्या मृत्युनंतर ती मिळकत मयत चंद्रभान सहारे यांच्या नावे झाली. रामचंद्र सहारे यांच्या मृत्युनंतर ती मिळकत वादी, प्रतिवादी क्र.०५ व मयत चंद्रभान यांच्या संयुक्त मालकीची होती. परंतु सदर मिळकत मयत चंद्रभान हा वहिती करीत होता. चंद्रभान सहारे मयत झाल्यानंतर वादींनी जमीन गट क्र.१५१ चा ७/१२ उतारा काढला असता त्यांना असे समजले की मिळकतीचे तीन वेगवेगळे गट पडले आहेत. चंद्रभान सहारे याने गट क्र.१५१/२ हा त्याच्या स्वतंत्र नावाने केला होता.

०२. वास्तवीक वादींच्या वडीलांनी कोणतेही वाटणीपत्र करुन दिले नव्हते. मयत चंद्रभान सहारे याने वाद मिळकतीपैकी गट क्र.१५१/२ हा प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना बेकायदेशीर विक्री केला आहे. वादींना असे समजले आहे की प्रतिवादी हे वाद मिळकत त्रयस्त इसमांना हस्तांतर करण्याच्या तयारीत आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.०६ व ०७ याने मयत चंद्रभान यांच्या नावे पुन्हा क्षेत्रफळ २.८१ हे. आर चे खरेदीखत करुन दिले आहे. त्यामुळे वाद मिळकतीपैकी गट क्र.१५१/३ ला प्रतिवादी ०६ ते ०९ यांचे नाव लागले आहे. वादींनी प्रतिवादींना नोटीस पाठविली असता त्यांनी नोटीसचा कोणताही जबाब दिला नाही. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी क्र.०५ यांनी नि.क्र.०८ नुसार लेखी बयान दाखल करुन वादीचा दावा मान्य केला. त्यामध्ये तिने, वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०४ सोबत असलेले नातेसंबंध मान्य केले. वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असुन त्यामध्ये कोणतेही हिस्सेवाटे झाले नसल्याची बाब तिने त्यामध्ये नमुद केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.०१ ते ०४ व ०६ ते ०९ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी होऊनही ते हजर न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला.

०५. वादपत्रातील कथनावरुन पुढील मुद्ये उपस्थित होतात. सदर मुद्दे यापुढे नमुद करून त्यावर मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी असे सिध्द करतात काय की वाद मिळकत ही त्यांची वडीलोपार्जीत मिळकत असुन त्यामध्ये त्यांचा प्रत्येकी १/६ हिस्सा आहे ? | होय. |
| ०२. | वादी असे सिध्द करतात काय की मयत चंद्रभान सहारे याने दिनांक १२.०४.२०१० रोजी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांच्या हक्कात केलेले वाद मिळकतीचे खरेदीखत बेकायदेशीर असुन त्यांच्यावर बंधनकारक नाही ? | होय. |
| ०३. | वादी असे सिध्द करतात काय की प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांनी मयत चंद्रभान सहारे यांना दिनांक | |

| | | |
|---|---|---|
| | ०७.०९.२०13 रोजी करुन दिलेले वाद मिळकतीचे खरेदीखत बेकायदेशीर असुन त्यांच्यावर बंधनकारक नाही ? | होय. |
| ०४. | वादी ह्या वाद मिळकतीची वाटणी होऊन स्वतंत्र कब्जा मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास पक्षकारांचा प्रत्येकी हिस्सा किती ? | होय. |
| ०५. | वादी ह्या त्यांनी मागणी केल्याप्रमाणे घोषणा होऊन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| ०६. | वादी ह्या त्यांनी मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| ०७. | काय आदेश व हुकूमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## वादींचा तोंडी पुरावा

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | साक्षीदार क्र. | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | सौ. रंजना ताराचंद पाटील | ०१ | २० |

## वादींचा कागदोपत्री पुरावा

| अनु. क्र. | कागदपत्राचे विवरण | निशाणी क्र. |
|---|---|---|
| ०१. | गट क्र.१५१/१ चा ७/१२ उतारा व ८-अ | २१ व २२ |
| ०२ | गट क्र.१५१/२ व गट क्र.१५१/३ चे ७/१२ उतारे व ८-अ | २३ ते २६ |
| ०३ | फेरफार नोंद क्रमांक ४०१ ची प्रमाणीत प्रत | २७ |

| | | |
|---|---|---|
| ०४. | अधिकार अभिलेख पंजी | २८ |
| ०५. | फेरफार नोंद क्रमांक ७१ ची प्रमाणीत प्रत | २९ |
| ०६. | फेरफार नोंद क्र.३९९ ची प्रमाणीत प्रत | ३० व ३१ |
| ०७. | खरेदीखत क्र.१३९१/२०१३ ची प्रत | ३२ |
| ०८ | खरेदीखत क्र.४२३/२०१० ची प्रत | ३३ |
| ०९. | प्रतिवादींना पाठवलेली नोटीस | ३४ |
| १०. | पोस्टाच्या पावत्या | ३५ ते ३७ |
| ११. | पोहोच पावती | ३८ |
| १२. | पोस्टाचे दोन बंद लिफाफे | ३९ ते ४० |
| १३. | वर्तमानपत्र | ४२ |

०६. वादीतर्फे विधीज्ञ श्री.पी.के थोटे यांचा सखोल युक्तीवाद एकला.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ करीता :**

०७. वादींच्या कथनानुसार वाद मिळकत वडीलोपार्जीत असुन त्यामध्ये त्यांचा प्रत्येकी १/६ हिस्सा आहे. सदर बाब सिध्द करण्यासाठी वादी रंजना यांनी नि.क्र.२० वर शपथपत्र दाखल करुन साक्ष नोंदवीली आहे. त्यामध्ये त्यांनी दाव्यातील कथनाची पुनरावृत्ती करुन वाद मिळकत ही त्यांची वडीलोपार्जीत मिळकत असुन त्यामध्ये त्यांचा प्रत्यकी १/६ हिस्सा असल्याचे कथन केले आहे. पुढे त्यांनी कथन केले की त्यांचा मयत भाऊ चंद्रभान याने प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना वाद मिळकतीपैकी काही हिस्सा

दिनांक १२.०४.२०१० रोजी खरेदीखत क्र.४२३/२०१० नुसार बेकायदेशीर विक्री केली असुन ते खरेदीखत त्यांच्यावर बंधनकारक नाही. त्यांनी प्रतिवादीला वाद मिळकत वाटणी करुन मागितली असता त्यांनी नोटीसचे कोणतेही उत्तर दिले नाही. प्रतिवादी क्र.०१ ते ०४ व ०६ ते ०९ यांच्या विरुध्द दावा एकतर्फा असल्यामुळे त्यांचा पुरावा विना आव्हानीत राहिला आहे.

०८. विशेष बाब म्हणजे प्रतिवादी क्र.०५ ही वादींची व मयत चंद्रभान यांची आई आहे. तिने लेखी जबाब नि.क्र.०८ नुसार दावा मान्य केला आहे. त्यामध्ये त्यांनी वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असुन त्याचे हिस्सेवाटे झाले नसल्याची बाब नमुद केली आहे. अभिलेखावरील अधिकार अभिलेख पंजी नि.क्र.२८ वरुन असे स्पष्ट होते की वाद मिळकत गट क्र.१५ जुना गट क्र.२५ ही वादींचे आजोबा जयराम जयसींग यांच्या नावे होती. त्याप्रमाणे वाद मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत आहे या कथनास कोणतेही आव्हान दिले गेले नाही. त्यामुळे वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असल्याचे सिध्द होते.

०९. शेतजमीन गट क्र.१५१/१ चा ७/१२ उतारा नि.क्र.२१ वर वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०५ यांची नावे आहेत. शेत जमीन गट क्र.१५१/२ नि.क्र.२३ वर प्रतिवादी क्र.०१ ते ०४ यांची नावे आहेत व शेतजमीन गट क्र.१५१/३ वर प्रतिवादी क्र.०२ ते ०९ यांची नावे आहेत. फेरफार नोंद क्र.७१ नि.क्र.२९ वरुन असे स्पष्ट होते की तो फेरफार हा वाटणी नुसार घेण्यात आला आहे. त्यानुसार वाद मिळकत गट क्र.५१ ही आपसी वाटणीनुसार मयत चंद्रभान सहारे यांना करुन दिली होती. परंतु त्यामध्ये त्यांचे वडील रामचंद्र, वादी व प्रतिवादी क्र.०५ यांना कोणताही

हिस्सा दिलेला नाही. वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असल्यामुळे ती वाटणी ही कायदेशीर नाही. त्यामुळे त्या वाटणीआधारे मयत चंद्रभान सहारे हा संपूर्ण वाद मिळकतीचा मालक होत नाही.

१०. वादी ह्या मयत रामचंद्र जयराम सहारे यांच्या मुली असल्याबाबत कोणतेही दुमत नाही. त्याचप्रमाणे वाद मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी झाल्याची कोणतीही बाब अभिलेखावरुन स्पष्ट होत नाही. मयत रामचंद्र सहारे यांच्या मृत्युपश्चात त्यांना वादी ह्या चार मुली, मयत चंद्रभान हा एक मुलगा व प्रतिवादी क्र.०५ लिलाबाई असे वारस होते. त्यामुळे त्यांचा वाद मिळकतीमध्ये प्रत्येकी १/६ हिस्सा आहे. सबब मी, मुद्दा क्र.०१ चे उत्तर होकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.०२ व ०३ करीता</u> :**

११. वादींच्या कथनानुसार त्यांचा भाऊ मयत चंद्रभान सहारे याने दिनांक १२.०४.२०१० रोजी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांच्या हक्कात वाद मिळकतीचे खरेदीखत केले असुन ते बेकायदेशीर आहे व ते त्यांच्यावर बंधनकारक नाही. वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असुन त्याबाबत वाटण्या झाल्या नाहीत ही बाब सिध्द झाली आहे. खरेदीखत नि.क्र.३३ चे अवलोकन केले असता वाद मिळकत पैकी गट क्र.१५१/२ क्षेत्रफळ ४ हे ०२ आर मयत चंद्रभान यांनी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना विक्री केले आहे. परंतु मयत चंद्रभान यांचा वाद मिळकतीमध्ये १/६ हिस्सा असल्यामुळे त्यांच्या हिस्याला ०.९० क्षेत्रफळ येते. असे असतांना त्यानी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना ४.०२ हे. आर चे खरेदीखत करुन दिले आहे. वाद मिळकतीच्या वाटण्या झाल्या नसतांना व वाद मिळकत ही वडीलोपार्जीत

असल्यामुळे मयत चंद्रभान यांना सदर क्षेत्रफळ विकी करण्याचा कोणताही अधिकार पोहोचत नाही. त्यामुळे सदरचे खरेदीखत हे बेकादेशीर असुन वादींच्या हिस्यावर बंधनकारक नाही.

१२. त्यानंतर प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांनी मयत चंद्रभान याच्या नावे दिनांक ०७.०९.२०१३ रोजी वाद मिळकत गट क्र.१५१/२ पैकी २ हे ८१ आर क्षेत्रफळाचे खरेदीखत करुन दिले आहे. सदर खरेदीखतानुसार प्रतिवादी क्र.०६ व ०७ याने मयत चंद्रभान याच्या कडुन ३ एकर शेतजमीन विकत घेतली होती. परंतु नजरचुकीने ०९.९३ एकर लिहिल्या गेल्यामुळे अतिरीक्त क्षेत्रफळ मयत चंद्रभान यांना परत करण्यासाठी नमुद खरेदीखत केले होते. नमुद दोन्ही खरेदीखत लक्षात घेता मयत चंद्रभान सहारे यांनी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना एकुन ०१.२१ हे. आर क्षेत्रफळ विक्री केले आहे. वास्तवीक मयत चंद्रभान यांचा त्यावेळी वाद मिळकतीमध्ये फक्त ०.९० आर. अविभक्त हिस्सा होता. त्यामुळे सदरचे खरेदीखत हे बेकायदेशीर असुन वादींच्या हिस्यांवर बंधनकारक नाही. सबब मी, मुद्दा क्र.०२ व ०३ चे उत्तर होकारार्थी नोदंवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ करीता</u> :**

१३. वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असुन त्याचे सरस निरस मानाने वाटणी झाली नाही ही बाब अभिलेखावरील पुराव्यावरुन सिध्द झाली आहे. यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे वादीं, प्रतिवादी क्र.०५ व मयत चंद्रभान यांचा वाद मिळकतीमध्ये प्रत्येकी १/६ हिस्सा अविभक्त आहे. त्यामुळे वादी ह्या वाद मिळकतीची वाटणी होऊन प्रत्येकी १/६ स्वतंत्र हिस्सा मिळण्यास पात्र आहेत. प्रतिवादी क्र.०१ ते ०४ हे मयत चंद्रभान यांचे

वारस आहेत. मयत चंद्रभान यांचा वाद मिळकतीमध्ये ०.९० आर अविभक्त हिस्सा होता. परंतु त्यांनी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना १.२१ हे. आर म्हणजेच त्यांच्या अविभक्त हिस्यापेक्षा जास्त क्षेत्राचे खरेदीखत करुन दिले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०१ ते ०४ यांचा वाद मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा राहात नाही. सबब मी, मुद्दा क्र.०४ चे उत्तर होकारार्थी नोदंवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.०५ करीता</u> :**

१४. वादींनी वाद मिळकतीमध्ये त्यांचा प्रत्येकी १/६ हिस्सा असल्याची बाब सिध्द केल्यामुळे वाद मिळकतीमध्ये त्यांचा प्रत्येकी १/६ हिस्सा असल्याचे घोषीत होऊन मिळण्यास वादी ह्या पात्र आहे. त्याचप्रमाणे मयत चंद्रभान सहारे याने वाद मिळकतीपैकी त्यांच्या अविभक्त हिस्यापेक्षा जास्त हिस्याचे खरेदीखत प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना करुन दिले आहे. त्यामुळे ते खरेदीखत वादीं यांच्या हिस्यावर बंधनकारक नाही. सबब मी, मुद्दा क्र.०५ चे उत्तर होकारार्थी नोदंवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.०६ करीता</u> :**

१५. अभिलेखावरील वाद मिळकतीपैकी गट क्र.१५१/२ चा ७/१२ उतारा हा प्रतिवादी क्र.०१ ते ०४ यांच्या नावे आहे. तसेच गट क्र.१५१/३ चा ७/१२ उतारा हा प्रतिवादी क्र.०६ ते ०९ यांच्या नावे आहेत. यापूर्वी नमुद केल्याप्रमाणे मयत चंद्रभान सहारे यांना केवळ त्यांचा ०.९० आर अविभक्त हिस्सा विक्री करण्याचा अधिकार होता. परंतु, खरेदीखताआधारे प्रतिवादी क्र.०६ ते ०९ यांच्या नावे ०१.२१ हे.आर मिळकत झाली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०६ ते ०९ हे फक्त ०.९० आर क्षेत्रफळाचे कायदेशीर मालक आहेत. महसुल अभिलेखावर वाद मिळकतीला

प्रतिवादी यांची नावे असल्यामुळे त्यांच्याकडुन मिळकत हस्तांतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पात्र पक्षकार यांना वाद मिळकतीतील हिस्सा मिळेपर्यंत प्रतिवादींनी वाद मिळकत हस्तांतर करु नये असा मनाई हुकुम पारीत करणे आवश्यक आहे. सबब मी, मुद्दा क्र.०६ चे उत्तर होकारार्थी नोदंवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.०७ करीता</u> :**

१६. मुद्दा क्र.०१ ते ०७ चे निष्कर्ष लक्षात घेता वादींचा दावा डिक्री करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सबब, मुद्दा क्र.०७ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

०१. दावा डिक्री करण्यात येतो.

०२. वादी क्र.०१ ते ०४ व प्रतिवादी क्र.०५ यांचा वाद मिळकतीमध्ये प्रत्येकी १/६ हिस्सा असल्याचे घोषीत करण्यात येते.

०३. वादी क्र.०१ ते ०४ व प्रतिवादी क्र.०५ यांना वादमिळकतीची वाटणी करुन प्रत्येकी १/६ हिस्साचा स्वतंत्र कब्जा देण्यात यावा.

०४. मयत चंद्रभान सहारे यांनी प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना नोंदवुन दिलेले खरेदीखत क्र.४२३/२०१० आणि प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांनी मयत चंद्रभान सहारे यांच्या हक्कात नोंदवुन दिलेले खरेदीखत क्र.१३९१/२०१३ हे वादींच्या हिस्यावर बंधनकारक

नाही असे घोषीत करण्यात येते.

०५. वाद मिळतीची वाटणी करुन कब्जा देण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रिसेप्ट पाठविण्यात यावे.

०६ येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

PARASRAM KUNDLIK MUTKULE

Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.03.12 17:57:40 +0530

दिनांक–१२.०३.२०२६

**(पी. के. मुटकुळे)**

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

कुही, जि. नागपूर.

## –<u>प्रमाणपत्र</u>–

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत असुन बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – सौ. व्ही. आर. सावरकर
न्यायालयाचे नांव – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कुही,
जि. नागपूर.